# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक- २३९

**(सभावृत्तांत)**

**दिनांक- ०८/०९/२०२१** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार, दिनांक **०८/०९/२०२१** रोजी **दु.०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा.सभापती, स्थायी समिती यांचे दालनातून मा.सभापती, स्थायी समिती हे मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित केली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य ऑनलाईन व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित होते.

1. **मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे - सभापती**
2. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
3. मा.संतोष बबन कांबळे
4. मा.अभिषेक गोविंद बारणे
5. मा.बुर्डे सुवर्णा विकास
6. मा.फुगे भिमाबाई पोपट
7. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
8. मा.सुलक्षणा राजू धर
9. मा.भोईर सुरेश शिवाजी
10. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
11. मा.यादव मीनल विशाल
12. मा.भालेकर प्रविण महादेव
13. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
14. मा.पाडाळे निता विलास

याशिवाय मा.राजेश पाटील- आयुक्त, मा.ढाकणे- अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.राजन पाटिल- शहर अभियंता, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.नाळे- उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.खोत- उप आयुक्त, मा.निकम, मा.भालकर, मा.सवणे, मा.इंगळे- सह शहर अभियंता, मा.लडकत- प्र.सह.शहर अभियंता,मा.बहुरे, मा.देशमुख, मा.आगळे,

मा.गायकवाड- सहाय्यक आयुक्त, मा.पोमण– मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा. डॉ. वाबळे- अधिष्ठता वाय.सी.एम.एच., महिला वैद्यकीय अधिकारी- डॉ.डांगे, मा.देशमुख, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा.भोसले, मा.पवार, मा.रामगुडे, मा.घुमाळ, मा.काळे, मा.भागवाणी- कार्यकारी अभियंता, मा.जगताप- कामगार कल्याण अधिकारी, मा.कोळप- प्रशासन अधिकारी, मा.गायकवाड – जनता संपर्क अधिकारी, मा.जरांडे- सुरक्षा अधिकारी, मा.गोफणे- आरोग्य अधिकारी, हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले.**

विषय क्र.३०) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विकास प्रकल्प योजनेसाठी आवश्यक कर्ज/कर्जरोखे उभारणेकामी मान्यता देणेबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत.

विषय क्र.३१) वाय.सी.एम. रुग्णालय व मनपाचे इतर रुग्णालयाकरीता नोंदणीकृत संस्थेमार्फत वैद्यकीय अधिकारी, स्टाफनर्स तसेच इतर पॅरामेडीकल स्टाफ व कर्मचारी नेमणेकामी एजन्सी निश्चित करणेबाबत.

विषय क्र. ३२) पिंपरी चिंचवड मनपा व वायसीएम रुग्णालय येथे प्रेमाचा चहा व इतर चहाचे केंद्र चालविणेस मान्यता देणेबाबत.

विषय क्र.३३) पिंपरी चिंचवड शहरातील सार्वजनिक गणेशोत्सवासाठी मंडळाकरीता मंडप परवानगी व शुल्क माफीस मान्यता देणेबाबत.

विषय क्र.३४) सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील कामांच्या तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत.

विषय क्र.३५) सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील कामांच्या तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत.

------------

अ) मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२३७ दि.२५/०८/२०२१ व दि.०१/०९/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२३८ दि.०१/०९/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------------

ठराव क्रमांक- १०२३९ विषय क्रमांक- ०१

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- जलशुध्दीकरण से.२३

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/पापु/१६८/२०२१,दि.०६/०८/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

"पवना धरणातून से.क्र. २३ जलशुध्दीकरण केंद्र निगडी पर्यंत पाणी आणणे साठी थेट पाईप लाईन टाकणे या कामाचा आदेश ठेकेदार मे. एनसीसी-एसएमसी-इंदू (जेव्ही) यांना दि.३०/०४/२००८ रोजी देणेत आला असून कामाची मूळ मुदत २४ महिने म्हणजेच दि.२८/०४/२०१० पर्यंत होती. सदर काम चालु असतानाच्या दरम्यान दि.०९/०८/२०११ रोजी मुंबई – पुणे द्रुतगती मार्गावर बऊर टोलनाका येथे या प्रकल्पा विरोधात झालेल्या रस्ता रोको आंदोलन प्रसंगी झालेल्या पोलिस गोळीबारात ३ शेतक-यांचा मृत्यु झाला आहे. त्याअनुषंगाने दि.१०/०८/२०११ रोजीच्या पत्रान्वये मा. जिल्हादंडाधिकारी, पुणे यांनी "जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था परिस्थिती अबाधित ठेवण्यासाठी वरिष्ठ पातळीवर सदर योजनेबाबत बैठक होईपर्यंत पवनाधरणातून बंद पाईपलाईन द्वारे पाणीपुरवठा योजनेचे काम तूर्त थांबविणेत यावे" अशी विनंती केली होती. त्याअनुषंगाने सदरचे काम दि.१०/०८/२०११ पासून आजतागायत बंद आहे. आतापर्यंत सदरचे काम १२.६२% एवढे पुर्ण झाले असून मुदतवाढ दि. ३१/१२/२०२१ पर्यंत घेणेत आलेली आहे. काम चालु असतानाच्या काळात ठेकेदाराने १८०० मि.मी. व्यासाचे, १२ मी. लांबीचे, १० व १२ मि.मी जाडीचे एकूण लोखंडी पाईप २१६९ नग आणि पाईप जोडणीसाठी ५८.१७ मी. लांबीचे Special आणून ठेवलेले आहेत. सदरचे लोखंडी पाईप एकूण २६.६० एकर एवढ्या क्षेत्रामध्ये ठेवलेले आहेत. या व्यतिरिक्त ४५ x १५ मीटर च्या बंदिस्त गोडाऊन मध्ये पाणीपुरवठा विषयक २४४ व्हॉल्वस, ६ पंप्स तसेच १२ विद्युत मोटर्स, विद्युत संबंधित ५० व्हॉल्वस, ३२ ट्रान्सफार्मर व इतर विद्युत जोडणी साहित्य ठेवलेले आहे. सदरच्या साहित्याचे संरक्षण करणेसाठी ठेकेदाराने कामाच्या आदेशापासून आजतागायत १५ सुरक्षारक्षक आणि १ सुपरवायझर असे एकूण १६ कर्मचारी नेमलेले आहेत. साईटवरील लोखंडी पाईप आणि बंदिस्त गोडाऊन मधील मेटेरियल इ. सर्व बाबी ८ ठिकाणी ठेवणेत आलेले आहे. त्यापैकी चार जागा मनपा / शासनाच्या रस्त्याच्या कडेला असल्यामुळे जागेच्या भाड्याचा प्रश्न उदभवला नाही. परंतु उर्वरित ४ जागा वडगाव मावळ तालुक्यात खाजगी जागा मालक यांच्या जागेत असून त्याचे क्षेत्र २६.६० एकर एवढे आहे. ठेकेदार मे.एनसीसी-एसएमसी-इंदू (जेव्ही) यांचे दि.२५/०३/२०१९ रोजीचे पत्र क्र.PCMC/PAWANA/18-19/MARCH/04 द्वारे निविदा समाप्तीची (Termination notice) सुचना दिली आहे. दि.०१/१०/२०२० च्या मंजूर प्रस्तावामुसार जागेचे भाडे आणि सुरक्षारक्षकांची देयके पवना गोळीबार दुर्घटनेपासून म्हणजेच दि.१०/०८/२०११ पासून दि.२५/०४/२०१९ पर्यंत येणारी ररु.७.६५ कोटी याबाबत recommended असे नमूद करणेत आले असून तपासणी करुन पेमेंट देण्यास शिफारस करणेत आली आहे. दि.२६/०४/२०१९ पासून दि.३१/१०/२०२० पर्यंतची र.रु.२.६४ कोटी चे देयक ठेकेदार मे.एनसीसी-एसएमसी-इंदू (जेव्ही) यांनी अंतिम बिल सादर केलेल्या दिनांकापासून पवना प्रकल्पाचे काम महाराष्ट्र शासनाच्या परवानगीनंतर पुनश्चःचालु होण्याचा दिनांक यामधील अदा करावे लागणार आहे. ठेकेदारास एकूण र.रु. १०.२९ कोटी एवढी रक्कम अदा करावयाची आहे. मनपा कडील सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात इतर विशेष कामे पाणीपुरवठा लेखाशिर्षाकाअंतर्गत पान क्रमांक ४४२, अ.क्र. २ वर

सदर कामाचा समावेश करणेत आलेला असून त्यासाठी तरतूद र.रु.१० लाख एवढी आहे. तरी सदरची तरतूद अपुरी पडणार असल्याने त्यामध्ये वाढ करावी लागणार आहे. जागा मालकाचे भाडे आणि सुरक्षरक्षकांचे ठेकेदाराचे देयक याचा अंदाजे सरासरी महिना र.रु.१५ लाख एवढा खर्च येत आहे. दि.२६/०४/२०१९ पासून दि.३१/०३/२०२२ पर्यंत एकूण ३६ महिन्यांसाठी र.रु.५.४० कोटी एवढा खर्च येणार आहे व दि. १०/०८/२०११ पासून दि.२५/०५/२०१९ पर्यंत र.रु.७.६५ कोटी असा एकूण १३.०५ कोटी एवढा खर्च होणार आहे. सदर खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे तसेच सदर कामास वाढीव तरतूद घ्यावी लागणार आहे. तरी त्याअनुषंगाने जागा मालकांचे भाडे व सुरक्षा रक्षकांचे ठेकेदाराचे देयक यांना दि. १०/०८/२०११ ते ३१/०३/२०२२ पर्यंत येणा-या खर्चास र.रु.१३.०५ कोटी साठीचे खर्चास तसेच होणा-या खर्चास तरतूद अपुरी पडत असल्याने प्रस्तावात नमुद प्रमाणे वाढ/घट तक्ता र.रु.१२.९५ कोटी एवढा रकमेचा असून त्यास मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/घट र.रु.१२.९५ कोटी)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२४० विषय क्रमांक- ०२

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- पाणीपुरपवठा

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति आयुक्त(१) यांचे पत्र क्र.पापु/८/कावि/३०४/२०२१,दि.३०/०८/२०२१.

मा.अति आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.२०/०१/२०२०-२१ सन २०२०-२१ करिता क प्रभागातील पाण्याच्या टाक्यांवर पाणीपुरवठा संबंधित वाल्व्ह ऑपरेशन करणेकरिता मजुर पुरविणे या कामासाठी (निविदा र.रू.२,०८,६८,९९६/- + सेवा शुल्क ५% र.रु.१०,४३,४५०/- = र.रु.२,१९,१२,४४६/- (अक्षरी र.रु.दोन कोटी एकोणावीस लाख बारा हजार चारशे सेहेचाळीस फक्त) मधून रॉयल्टी व मटेरीअल टेस्टिंग चार्जेस रक्कम वगळून एकूण निविदा रक्कमेवरील ५% सेवा शुल्क र.रु.१०,४३,४५०/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम मे.जय भवानी इंटरप्रायजेस या ठेकेदाराकडून सेवा शुल्क र.रु.१०,४३,४५०/- पेक्षा सुधारित दर र.रु.८,३४,७६०/- दराची म्हणजेच र.रु.२,०८,६८,९९६/- + रॉयल्टीची रक्कम रु.०/- + मटेरीअल टेस्टिंग चार्जेस रक्कम रु.०/- + सेवा शुल्क र.रु.८,३४,७६०/- = एकूण र.रु.२,१७,०३,७५६/- (अक्षरी र.रु.दोन कोटी सतरा लाख तीन हजार सातशे छपन्न फक्त) पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार वेळोवेळी कामगार कल्याण विभाग यांचेकडील परिपत्रकानुसार प्रसिद्ध होणारे किमान वेतन दर यांचे नुसार वाढ/घट अदा करणेस व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस भाववाढ कलमानुसार निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२४१ विषय क्रमांक- ०३

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- फ क्षेत्रीय

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति आयुक्त(१) यांचे पत्र क्र.फक्षेका/पापु/५/कावि/८७/२०२१,दि.३०/०८/२०२१.

मा.अति आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मा.स्थायी समिती ठराव क्र.७१९२, दि.१४/०६/२०२० अन्वयेचे ठरावानुसार मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.१५/०१/२०१९-२० सन २०१९-२० करिता फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत कृष्णानगर व इतर ठिकाणी वाल्व्ह ऑपरेशन व्यवस्थापन करणेकरिता मजूर पुरविणेकामी (२०१९-२०) हे काम मे.राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित या ठेकेदाराकडून निविदा र.रु.७४,९७,७४८/- पेक्षा सुधारित दर ०.९४% कमी दराची म्हणजेच र.रु. ७४,२७,२६९/- पर्यंत काम करून घेणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार या कामाचा आदेश ठेकेदार “मे. राजलक्ष्मी स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.” यांना दिनांक १४/०८/२०२०रोजी देणेत आला आहे. सदर कामाची मुदत १२महिने म्हणजेच दिनांक १३/०८/२०२१पर्यंत आहे.त्यानुसार काम चालू आहे. त्यानंतर मा. स्थायी समिती ठराव क्र.८१५५ दि. १९/०१/२०२१ अन्वये र.रु.९१,३४,११२/- या खर्चास सुधारित मान्यता मिळालेली आहे.कामगार कल्याण विभागाकडील पत्रानुसार दि.१ जुलै २०२० व दि.१ जानेवारी २०२१ पासून कामगारांचे किमान वेतन दर वाढलेले आहेत. त्याप्रमाणे कामगारांना किमान वेतनानुसार १४ ऑगस्ट २०२० पासून वाढीव वेतन अदा करणे क्रमप्राप्त आहे. तसेच सद्यस्थितीत अशा स्वरूपाच्या कामाची निविदा प्रसिद्ध केलेली असून सदर निविदेची कार्यवाही होऊन नवीन काम हाती येईपर्यंत दि.१३/९/२०२१ पर्यंत कालावधी लागू शकतो. त्यामुळे सदर काम सुधारित करणे आवश्यक आहे. सबब सद्यस्थितीत चालू असलेल्या कामातून फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात पाणीपुरवठा करण्यासाठी चालू काम, सुधारित करण्याची आवश्यकता असून, सदर काम चालू ठेवण्यासाठी सुधारित खर्चाची र.रु.९९,९२,१७९/-इतकी येत आहे. त्यामधून या पूर्वीच्या सुधारित खर्चाच्या मान्यतेची र.रु.९१,३४,११२/- वजा जाता येणारा वाढीव खर्च र.रु.८,५८,०६७/- इतका होणार आहे. तसेच या कामासाठी येणाऱ्या वाढीव खर्चाचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच खालील प्रमाणे सदर कामासाठी वाढ घट करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | पा.क्र. | अ.क्र. | सन २०२१-२२ चा मूळ अंदाज | वाढ | घट | सन २०२१-२२ साठी सुधारित तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | “फ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत कृष्णानगर व इतर ठिकाणी व्हॉल्व्ह ऑपरेशन करिता मजूर पुरविणे” | ७४७ | १५ | ४५,८८,०००/- | ७,९३,०००/- | - | ५३,८१,०००/- |
| २ | “फ क्षेत्रीय कार्यालयाचे परिसरात विविध ठिकाणी व्हॉल्व्ह ऑपरेशन करिता मजूर पुरविणे” | ७४८ | २५ | ५०,००,०००/- | - | ७,९३,०००/- | ४२,०७,०००/- |
| | एकूण र.रु. | | | ९५,८८,०००/- | ७,९३,०००/- | ७,९३,०००/- | ९५,८८,०००/- |

सदर कामासाठी येणारी वाढीव र.रु.**८,५८,०६७/-** इतक्या खर्चाचे प्रस्तावास व वाढ/घट र.रु.७,९३,०००/-(अक्षरी र.रु.सात लाख त्र्याण्णव हजार फक्त) इतक्या रकमेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२४२ विषय क्रमांक- ०४

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- स्थापत्य BRTS

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/BRTS/५८९/२०२१,दि.३०/०८/२०२१.

मा.अति आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.19/01/2021-2022 अन्वये सांगवी येथे औंध रुग्णालयासाठी कर्मचारी वसाहत अति महत्वाच्या व्यक्तींसाठी अतिथीगृह बांधणेचे उर्वरीत कामे करणे व इतर अनुषंगिक कामे करणे. कामी मे.पी.ए.शिरोळे इंजिनिअर्स अँड कॉन्ट्रॅक्टर नि.र.रू.1,63,11,315/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी त्रेसष्ठ लाख अकरा हजार तीनशे पंधरा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,62,66,565/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.1,62,66,565/- पेक्षा 25.57% कमी म्हणजेच र.रु.1,21,07,204/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.2,13,202/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.44,750/- = एकुण र.रु.1,23,65,156/- पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२४३ विषय क्रमांक- ०५

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- स्थापत्य ग मुख्य

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/ग-मुख्य/४९७/२०२१,दि.३०/०८/२०२१.

मा.अति आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/93/04/2020-21 अन्वये प्र.क्र.२३ मधील हेडगेवार पुल ते कुणाल रेसीडेन्सी पर्यंत जाणारा १२.०० मी. रुंद रस्ता विकसीत करणे कामी मे.बहिरट ब्रदर्स नि.र.रू.61,85,012/- (अक्षरी र.रु.एकसष्ट लाख पंच्याऐंशी हजार बारा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.61,11,229/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.61,11,229/- पेक्षा 28.88% कमी म्हणजेच र.रु.43,46,306/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.10,883/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.62,900/-

= एकुण र.रु.44,20,089/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२४४ विषय क्रमांक- ०६

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- स्थापत्य ग मुख्य

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/ग-मुख्य/४९८/२०२१,दि.३१/०८/२०२१.

मा.अति आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/38/01/2021-22 अन्वये प्र.क्र.२७ रहाटणी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा उभारणे व अनुषंगीक कामे करणेकामी पी एन नागणे नि.र.रू.2,20,80,578/- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी वीस लाख ऐंशी हजार पाचशे अठ्ठेहत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.2,20,28,578/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.2,20,28,578/- पेक्षा 13.59% कमी म्हणजेच र.रु.1,90,34,894/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,86,467/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.52,000/- = एकुण र.रु.1,92,73,361/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२४५ विषय क्रमांक- ०७

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- ड क्षेत्रीय, आरोग्य

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.डक्षे/८/कावि/१४३/२०२१,दि.२७/०८/२०२१.

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील म.न.पा.चे आरोग्य विभागाकडील सार्वजनिक शौचालयाचे व मुता-यांची यांत्रिकी पद्धतीने (पाण्याचे उच्चदाब फवा-याच्या सहाय्याने) व मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई, देखभाल व किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती करणे या कामासाठी निविदा नोटीस क्र.५/२०१८-१९निविदा प्रसिध्द करणेत आली होती. मे.श्री. महालक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांना प्रति सिट प्रति माहे ५५२.६९ दराने दर

स्वीकृत करणेत आला आहे. स्थायी समिती ठराव क्र.४०९४ दि.२२/०१/२०१९ नुसार संस्थेनी कामाचा सिलबंद करारनामा सादर केल्यानुसार क्र.डक्षे/३/कावि/१४३/२०१९, दिनांक.०८/०३/२०१९ अन्वये एकुण ३७८ सिट्स करीता प्रति माह येणारा खर्च र.रु.२,०८,९१७/- प्रमाणे दि.०८/०३/२०१९ ते दि.०७/०३/२०२१ पर्यंतचा कामाचा आदेश देण्यात आलेला होता. सदरची मुदत संपुष्टात आले नंतर व नविन निविदा कार्यवाही चालू असल्याने, कामाची आवश्यकता विचारात घेता तसेच संबधीत संस्थेचे कामकाज समाधानकारक असलेचे आरोग्य निरीक्षक व मुख्य आरोग्य निरीक्षक अहवाल सादर केलेनुसार आणि मे. श्री.महालक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांनी मुदतवाढ मिळणेकामी विनंती पत्रान्वये, मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८७२१, दि.२६/२/२०२१ अन्वये मे.महालक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सह. संस्था मर्या. यांना ड क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील म.न.पा.चे आरोग्य विभागाकडील सार्वजनिक शौचालयाचे व मुता-यांची यांत्रिकी पद्धतीने दैनंदिन साफसफाई, देखभाल व किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती करणे याकामी दि.०८/०३/२०२१ ते दि.०७/०७/२०२१ पर्यंत एकुण ४ महिने किंवा नवीन निविदा प्रक्रिया होई पर्यंत जे पहीले येईल या कालावधीसाठीयेणा-या खर्चास मान्यता देणेत आली असून इकडील आदेश क्र.डक्षे/८/कावि/३०/२०२१, दि.२५/२/२०२१ अन्वये दि.०८/०३/२०२१ ते दि.०७/०७/२०२१ पर्यंत एकुण ४ महिने किंवा नवीन निविदा प्रक्रिया होई पर्यंत जे पहीले येईल या कालावधीसाठी मुदतवाढ देणेत आलेली आहे. ड क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील म.न.पा.चे आरोग्य विभागाकडील सार्वजनिक शौचालयाचे व मुता-यांची यांत्रिकी पद्धतीने दैनंदिन साफसफाई, देखभाल व किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती करणे या कामाची मुदत दि.०७/०७/२०२१ रोजी संपत असलेने व नवीन निविदा प्रक्रीया कार्यवाही चालू असलेने दि.०८/०७/२०२१ ते दि.०७/११/२०२१ पर्यंत एकुण ४ महिने कालावधीसाठी .मे.महालक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.यांना मुदत वाढ देणेस व र.रु.८,४२,३००/- अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२४६ | विषय क्रमांक- ०८

दिनांक- ०८/०९/२०२१ | विभाग- मध्य साहित्य भांडार

सुचक- मा.बारणे अभिषेक | अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/९३६/२०२१,दि.३१/०८/२०२१.

मा.अति आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

Covid-19 या आजाराचा प्रादुर्भव रोखणे व कोरोना आजारास अटकाव करणेकामी नवीन भोसरी रुग्णालयातील तयार करणेत आलेल्या कोरोना वॉर्डसाठी दैनंदिन साफसफाईच्या कामकाजाकरीता लागणारे आवश्यक ते मनुष्यबळ २४ कर्मचारी व १ सुपरवायझर उपलब्ध करुन देणेकामी दिलेल्या आदेशाची मुदत दि.१२/०६/२०२१ रोजी संपुष्टात आलेने सध्याचा कोव्हीड-२ प्रादुर्भाव व परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता पुढील तीन महिने कालावधीसाठी म्हणजेच दि.१२/०९/२०२१ पर्यंत अथवा ई-निविदेची कार्यवाही होईपर्यंत मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., यांचे समवेत करण्यात आलेल्या करारनाम्यास अधिन राहून किमान वेतन कायदयानुसार दैनंदिन साफसफाईच्या कामकाजा करीता लागणारे आवश्यक ते मनुष्यबळ २४ कर्मचारी व १ सुपरवायझर

उपलब्ध करुन देणेकामी र.रु.६,७२,८३९/-प्रति महा प्रमाणे तीन महिन्यांकरीता (सर्व खर्चासहीत) येणा-या र.रु.२०,१८,५१७/- (अक्षरी र.रु.वीस लाख अठरा हजार पाचशे सतरा रु फक्त) चे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२४७ विषय क्रमांक- ०९

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- मध्य साहित्य भांडार

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/९३८/२०२१,दि.३१/०८/२०२१.

मा.अति आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

कोरोना विषाणुचा(Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी तातडीचे कामकाजास्तव मनपाच्या जिजामाता रुग्णालयाच्या नवीन इमारती मधील कॉरीडॉर, अंतर्गत व बाहय परिसराची दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करुन घेणेकामी मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. यांना दिलेल्या आदेशाची मुदत संपुष्टात आलेने आवश्यक लागणारे ३८ कर्मचारी, मशिनरी, रसायने व इतर खर्चा सहित सध्याचा कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव व परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता दि.१३/०६/२०२१ पासून पुढील तीन महिने कालावधीसाठी (दि.१२/०९/२०२१ पर्यत) अथवा ई-निविदेची कार्यवाही होईपर्यंत मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., यांचे समवेत वेळोवेळी करण्यात आलेल्या करारनाम्यास अधिन राहून व अनामत रक्कम घेवून किमान वेतन कायदयानुसार ३६ कामगार व २ सुपरवायझर यांचेकरीता येणारा प्रति महिना खर्च र.रु.९,८२,५९७/- (सर्व खर्चासहीत) प्रमाणे तीन महिने कालावधीकरीता येणा-या र.रु.२९,४७,७९१/-(अक्षरी र.रु.एकोणतीस लाख सत्तेचाळीस हजार सातशे एक्याण्णव फक्त) चे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२४८ विषय क्रमांक- १०

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- मध्य साहित्य भांडार

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/९४१/२०२१,दि.३१/०८/२०२१.

मा.अति आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या वाय.सी.एम. रुग्णालयात कोरोना बाधित रुग्ण मरण पावल्यास त्यावर Expression of Interest मध्ये निर्देशित केलेप्रमाणे योग्य तो प्रोटोकॉल पाळुन मृतदेहासंबंधी कामकाज करण्यासाठी पुर्वीचा आदेश दि.३०/०६/२०२१ रोजी संपुष्टात आल्याने अधिष्ठाता, PGI, YCMH यांनी केलेल्या विनंती नुसार M/s.Jai Bhawani Enterprises यांना त्यांचे समवेत पुर्वी झालेल्या करारनाम्यास अधिन राहून M/s.Jai Bhawani Enterprises पुढील तीन महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास र.रु.२८,०२१/- प्रति कर्मचारी प्रति महाप्रमाणे ३६ कर्मचा-यांकरीता माहे जुलै २०२१ या कालावधीकरीता प्रतिमहा र.रु.१०,०८,७५६/- प्रमाणे व माहे ऑगस्ट व

माहे सप्टेंबर २०२१ करीता २० कर्मचारी प्रति महा र.रु.५,६०,४२०/- प्रमाणे दोन महिन्यांकरीता र.रु.११,२०,८४०/-पुर्वीच्या आदेशातील मुदत संपुष्टात आलेने दि.०१/०७/२०२१ पासून दि.३०/०९/२०२१ कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामी व त्याकरीता येणा-या र.रु.२१,२९,५९६/- (अक्षरी र.रु.एकवीस लाख एकोणतीस हजार पाचशे शहाण्णव फक्त) चे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२४९ विषय क्रमांक- ११

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- मध्य साहित्य भांडार

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/९४३/२०२१,दि.३१/०८/२०२१.

मा.अति आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी तातडीचे कामकाजास्तव सदयस्थितीत संपुर्ण पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव पुन्हा एकदा मोठया प्रमाणात वाढलेने पॉझीटीव्ह रुग्णांची झपाटयाने वाढ होत असून कोविड-१९ रुग्णांचे प्रमाणे देखील वाढलेले आहे. मृतदेह रॅपिंग टीमकरीता कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम जम्बो रुग्णालय येथे व ऑटो क्लस्टर येथे M/s.Medbros Healthcare Pvt. Ltd., यांचे समवेत झालेल्या करारनाम्यास अधिन राहून कोरोनामुळे मयत रुग्णांचे मृतदेह रुग्णवाहिका/ शववाहिकेतून उतरविणे, अंत्यसंस्कारासाठी नंबर लावणे, विदयुत दाहिनी मध्ये चढविणे व स्मशानभूमी/ दफनभूमी मध्ये नियमानुसार अंत्यसंस्कार करणेबाबतचे सर्व प्रकारचे कामासाठी स्मशानभूमी/ दफनभूमी मध्ये १६ कर्मचारी उपलब्ध करुन देणेकामी व त्याकामी र.रु.२८,०२१/- प्रति महा प्रति कर्मचारी प्रमाणे र.रु.४,४८,३३६/- प्रमाणे तीन महिन्यांकरीता (दिनांक २१/०६/२०२१ ते २०/०९/२०२१ याकालावधी करीता**)** येणा-या र.रु.१३,४५,००८/- (अक्षरी र.रु.तेरा लाख पंचेचाळीस हजार आठ फक्त) चे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२५० विषय क्रमांक- १२

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- मध्य साहित्य भांडार

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/९४०/२०२१,दि.३१/०८/२०२१.

मा.अति आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

Covid-19 या आजाराचा प्रादुर्भव रोखणे व कोरोना आजारास अटकाव करणेकामी मनपाचे नविन भोसरी रुग्णालय व नविन जिजामाता रुग्णालयात मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., यांचेमार्फत हाऊस किंपींगचे काम करण्याकामी त्यांचे समवेत झालेल्या करारनाम्यास अधिन राहून नविन आकुर्डी रुग्णालय व नविन थेरगांव रुग्णालयातील तयार करणेत आलेल्या कोरोना वॉर्डसाठी तातडीने आवश्यक लागणारे सफाई कर्मचारी पुरविणेकामी मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., यांना देण्यात

आलेल्या कामकाजाचे आदेशाचे अनुषंगाने अनुक्रमे प्रति महिना र.रु.७,९७,९०२/- व र.रु.१०,६४,३६२/- असा एकूण र.रु.१८,६२,२६४/- प्रमाणे तीन महिन्यांकरीता र.रु.५५,८६,७९२/- (अक्षरी र.रु.पंचावन्न लाख शहाऐंशी हजार सातशे ब्याण्णव फक्त) चे खर्चास व मे.बी.व्ही.जी.इंडिया लि, यांना पुर्वी दिलेल्या आदेशाची मुदत संपुष्टात आले पासून पुढील २ महिना अथवा ई-निविदेची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता व सदरचा खर्च वैदयकीय विभागाकडील वाय.सी.एम. रुग्णालय व अन्य रुग्णालयाचे साफसफाई या लेखाशिर्षामधून भागविणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२५१ विषय क्रमांक- १३
दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- मध्य भांडार
सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश
संदर्भ- मा.अति आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मभां/८/कावि/१४३७/२०२१,दि.०१/०९/२०२१.
मा.अति आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

भारतीय साथ रोगनियंत्रण अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3) (क) नुसार कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम जम्बो कोविड हॉस्पिटल मधील सदर साथीच्या रुग्णांवर वैद्यकीय उपचार करण्यासाठी औषधे/साहित्यांची तातडीने आवश्यकता आहे. त्याकरिता मैं.मेडब्रोज हेल्थकेअर डायग्नोस्टीक सेंटर या संस्थेस वाय.सी.एम.हॉस्पिटल कडील तातडीक औषध खरेदी निविदा दरानुसार, आवश्यक असणारी तातडीक औषधे/साहित्य खरेदीकरून उपलब्ध करून देणेकामी होणा-या एकुणर.रु.45,01,452/- (अक्षरी र.रु.पंचेचाळीस लाख एक हजार चारशे बावन्न फक्त) GST सह चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार मनपा अधिनियम अनुसूचि ड प्रकरण 5(2)(2) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२५२ विषय क्रमांक- १४
दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- इ क्षेत्रिय
सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश
संदर्भ- मा.सहा आयुक्त यांचे पत्र क्र.इक्षेका/नि-६/कावि/३५४/२०२१,दि.१३/०८/२०२१.
मा.सहा आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ क्षेत्रिय कार्यालयाकडील विदयुत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र ‘अ’ मधील (१ ते १) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२५३ विषय क्रमांक- १५

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- ड क्षेत्रिय जलनि:सारण

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.डक्षेका/जनि/कावि/७९७/२०२१,दि.२८/०८/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या वॉर्ड क्र. २९ पिंपळे गुरव गावठाण व इतर भागात जलनि:सारण विषयक सुधारणा कामे करणेचे काम मार्च २०२० अखेर मुळ मुदतीत पुर्ण झालेले होते. त्यानुसार सदर कामाचे बिल लेखा विभागाकडे सादर करणेत आलेले होते. सदर कामासाठी सन २०२०-२१ चे सुधारीत व सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकात रक्कम रुपये ३६,९८,०००/- इतकी तरतुद ठेवणेत आलेली होती. परंतु जलनिःसारण विभागाची एकत्रित तरतुद संपुष्टात आल्याचे लेखा विभागाकडून देयकाची अदायगी करणेत आलेले नाही. तरी विषयांकित कामाचे देयक अदा करणेकामी सन २०२०-२१ चे सुधारीत व सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकातील खालील नमूद केलेल्या चालू कामांना सुधारीत प्रशासकीय मान्यता व आवश्यक तरतुद वर्गीकरण करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | पान क्र. | अ. क्र. | सन २०२१/२२ ची तरतुद | वर्गीकरण व आवश्यकतेनुसार होणारी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वाढ | घट |
| १) | वॉर्ड क्र.२९ पिंपळे गुरव गावठाण व इतर भागात जलनि:सारण विषयक सुधारणा कामे करणे. | ४६३ | १५ | ० | २८००००० | ० |
| २) | ड क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत पवनानदीच्या कडेने असलेल्या मुख्य गुरूत्व नलिकेवर अकस्मित उद्भवणा-या सुधारणा कामे करणे व RCC चेंबर बांधणे. | ४६३ | १८ | ३००७००० | ० | १८००००० |
| ३) | प्रभाग क्र. २९ मधील वैदुवस्ती, गुलमोहोर कॉलनी, काशिद पार्क, सुदर्शननगर व इतर परिसरात जलनिःसारण नलिका टाकणे व सुधारणा कामे करणे. | ४६३ | ११ | १८००००० | ० | १०००००० |
| | | | | ४८०७००० | २८००००० | २८००००० |

सदर कामाचे देयकाची अदायगी करणे कामी र.रु.२८,००,०००/- (अक्षरी र.रु.अठ्ठावीस लाख फक्त) एवढ्या तरतुदीची आवश्यकता असल्याने मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु.२८,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२५४ विषय क्रमांक- १६

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- वैद्यकीय

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/८३१/२०२१,दि.३१/०८/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

कोरोना रुग्णांची वाढती संख्या विचारात घेता मा.आयुक्त, मा.अति.आयुक्त १, मा.महापौर, गटनेते, अधिकारी, पदाधिकारी यांचे समवेत दिनांक २२.०३.२०२१ रोजी झालेल्या मिटींग मधील निर्णया प्रमाणे आणि कार्यकारणी समितीची दि. १५.०७.२०२१ चे मिटींग मध्ये घेतलेल्या निर्णया प्रमाणे कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जंबो कोविड रुग्णालयामध्ये एकूण ८०० बेडसुरु करणेकामी आदेश देणेत आले होते. दिनांक २५.०५.२०२१ बेडसंख्या कमी करणेत आलेली आहे. दि. १६.०८.२०२१ ते १५.०९.२०२१ (३१ दिवस) पर्यंत २०० बेडसाठी पुढील प्रमाणे मुदतवाढ आदेश देणेत आले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | दर प्रति दिन प्रती बेड | आयसीयु क्षमता ६० बेड | ऑक्सीजन बेड क्षमता १४० बेड | एकूण र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ऑक्सीजन युक्त बेड | १४०४.४८ | | ६०,९५,४४३.२० | ६०,९५,४४३.२० |
| ३ | आयसीयु बेड | ४३८५.९२ | ८१,५७,८११.२० | | ८१,५७,८११.२० |
| | | | | एकूण र.रु. | १,४२,५३,२५४.४० |

मेडब्रोज हेल्थकेअर डायग्नोस्टिक सेंटर यांना वरील प्रमाणे एकमहीन्यासाठी (३१ दिवस) मुदतवाढ कामकाज आदेश देण्यात आलेले आहेत. PMRDA मधील आदेशामध्ये नमूद केले प्रमाणे ऑक्सीजन बेड साठी ६०%, आयसीयु साठी ५०% आणि एचडीयु साठी ५०% गॅरेंटेड पेमेंट देणेत येणार असल्याने त्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२५५ विषय क्रमांक- १७

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- वैद्यकीय

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/८२९/२०२१,दि.३१/०८/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात कोरोना रुग्णांची संख्या पुन्हा वाढु लागले नंतर मा.आयुक्त यांचेकडील दि.०९.०४.२०२१ चे मान्य प्रस्तावान्वये M/s.Cellbeans Healthcare Informatics Pvt. Ltd. यांना क्र.मसाभां/४/कावि/३१९/२०२१ दि.१२.०४.२०२१. र.रु.५,९०,०००/- दि.२८.०३.२०२१ ते २७.०५.२०२१ पर्यंतच्या कामासाठी आदेस देणेत आले होते. सदर खर्चास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.९२६४ दि.२३.०४.२०२१ अन्वये मान्यता घेणेत आलेली आहे. M/s.Cellbeans Healthcare Informatics Pvt. Ltd. यांचे बरोबर दि.२४.०४.२०२१ रोजी करारनामा करणेत आलेला आहे. नोडल

अधिकारी यांनी M/s.Cellbeans Healthcare Informatics Pvt. Ltd.यांचे आदेशाचे मुदतीनंतर पत्र क्र.आ.म.स्टे/कावि/३१९/२०२१ दि.०७.०६.२०२१ चे पत्रान्वये तिन महीने मुदतवाढ देणेकामी कळविले आहे. मा.आयुक्त यांचे सुचने प्रमाणे कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जंबो हॉस्पिटल येथे नियुक्त असलेल्या एजन्सी बाबत निर्णय घेणेकामी समितीची नियुक्ती करुन मिटींग घेणेबाबत कलविले होते. त्या प्रमाणे मा.अति.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली सदर मिटींगमध्ये M/s.Cellbeans Healthcare Informatics Pvt. Ltd. यांना दि.११.०८.२०२१ पर्यंत मुदतवाढ देणेकामी निर्णय घेणेत आला. त्या प्रमाणे M/s.CellBeans Healthcare Informatics Pvt. Ltd. यांना दि.२८.०५.२०२१ ते ११.०८.२०२१ या कालावधीसाठी कामकाज आदेश देणेत आले होते. दि.१३.०८.२०२१ रोजी कार्यकारणी समिती मध्ये झालेल्या मिटींग मधील निर्णया प्रमाणे M/s.CellBeans Healthcare Informatics Pvt. Ltd. यांना दि.१२.०८.२०२१ ते ११.०९.२०२१ पर्यंत मुदतवाढ मंजूर करणेत येऊन कामकाज आदेश देणेत आला असल्याने मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२५६ | विषय क्रमांक- १८

दिनांक- ०८/०९/२०२१ | विभाग- वैद्यकीय

सुचक- मा.बारणे अभिषेक | अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/८२७/२०२१,दि.३१/०८/२०२१.
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने प्रसिध्द केलेल्या EOI प्रमाणे मे.रुबी एल केअर सर्व्हीसेस यांना कोविड केअर सेंटर सुरु करणेकामी बालनगरी, भोसरी कामकाज आदेश देण्यात आले होते. कोरोना रुग्ण कमी झाले नंतरही सदर कोविड सेंटर चालु ठेवणेत आले होते. सदर संस्थेस दि.०३.०८.२०२१ ते ०२.०९.२०२१ पर्यंत ३०० बेडसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यांना दि.०३.०८.२०२१ ते दि.०२.०९.२०२१ पर्यंत ३०० बेडसाठी एकूण र.रु.७९,०५,०००/- (अक्षरी र.रु.एकोणऐंशी लाख पाच हजार फक्त) चे कामकाज आदेश देणेत आले आहे. EOI ०३/२०२०-२१ मधील अटी शर्तींशी संलग्न राहून त्यांना कामकाज आदेश देण्यात आले असल्याने सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२५७ | विषय क्रमांक- १९

दिनांक- ०८/०९/२०२१ | विभाग- ह क्षेत्रीय स्थापत्य

सुचक- मा.बारणे अभिषेक | अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.हक्षेका/स्था/कावि/३६१/२०२१,दि.०२/०९/२०२१.
मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

प्रस्तुत प्रकरणी पिं.चिं.मनपाच्या ह क्षेत्रीय स्थापत्य विभागांतर्गत कार्यक्षेत्रात वरीलप्रमाणे काम करणेचे नियोजन आहे. सदर कामातून कोरोना बाधित क्षेत्र प्रतिबंधीत करणेकामी मंडप व्यवस्था करणे व इतर अनुषंगिक आवश्यक कामे करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड

महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये कोरोना कोव्हिड- १९ चे रूग्ण संख्या झपाट्याने वाढत आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र. ३० हद्दीत कासारवाडी, दापोडी फुगेवाडी इत्यादीचा भाग येत आहे. सदर दापोडी भागात प्रशासनाकडून ज्या भागात रूग्ण सापडत आहेत त्या भागाचे सीमा प्रतिबंधीत करणे, पोलीसांना पहारा देणेसाठी व बंदोबस्तासाठी मंडप टाकणे, प्रतिबंधीत क्षेत्र फ्लेक्स लावणे, त्याभागातील दुकानांना सम-विषम तारखेचे बोर्ड तयार करणे इत्यादी कामे दररोज करावी लागत आहेत. त्याकरिता स्थापत्य विभागामार्फत ठेकेदार यांची नेमणूक करणेकरीता मा. अति. आयुक्त(२) श्री. अजित पवार यांच्या दि.२३/०६/२०२० च्या मंजुर प्रस्तावानुसार व सुचनेनुसार दि.३१/०३/२०२१ ते दि.०७/०४/२०२१ दरम्यान रक्कम रू.३,००,०००/- चे कोटेशन मागविण्यात आले आहेत. त्यानुसार मे.लालदिप कन्स्ट्रक्शन यांचेकडून २.००% कमी इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र. ३० हद्दीत कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी इत्यादीचा भाग येत आहे. सदर दापोडी भागात प्रशासनाकडून ज्या भागात रूग्ण सापडत आहेत त्या भागाचे सीमा प्रतिबंधीत करणे, पोलीसांना पहारा देणेसाठी व बंदोबस्तासाठी मंडप टाकणे, प्रतिबंधीत क्षेत्र फ्लेक्स लावणे, त्याभागातील दुकानांना सम-विषम तारखेचे बोर्ड तयार करणे ही परिणामकारक दैनंदिन कामे होणे करिता सदर कामासाठी ठेकेदारनेमणे अत्यंत आवश्यकआहे.मे. लालदिप कन्स्ट्रक्शन यांची ठेकेदार म्हणून कामाकरीता यांची नेमणूक करणेत यावी असे मत आहे .त्यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे केलेली आहेत व सध्या काही कामे प्रगती पथावर आहेत त्यांनी मनपाला आत्तापर्यंत वेळोवेळी आवश्यक मागणीनुसार सेवा दिलेली आहे . सबब, त्याकामी मे. लालदिप कन्स्ट्रक्शनयांची नेमणुक करुन त्याकरीता ( २.००% कमी) एवढा दर प्राप्त झालेलाआहे. तरी प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कामाकरीता एकूण कामाच्या म्हणजे रक्कम रू.३,००,०००/- रक्कमेपैकी २.००% कमी या दराने म्हणजेच र.रू.२,९४,०००/- (र.रु.दोन लाख चौ-याण्णव हजार फक्त) पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करून बील अदायगी करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२५८ — विषय क्रमांक- २०

दिनांक- ०८/०९/२०२१ — विभाग- ह क्षेत्रीय स्थापत्य

सुचक- मा.बारणे अभिषेक — अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.हक्षेका/स्था/कावि/३६२/२०२१,दि.०२/०९/२०२१.
मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

प्रस्तुत प्रकरणी पिं.चिं.मनपाच्या ह क्षेत्रीय स्थापत्य विभागांतर्गत कार्यक्षेत्रात वरीलप्रमाणे काम करणेचे नियोजन आहे. सदर कामातून कोरोना बाधित क्षेत्र प्रतिबंधीत करणेकामी मंडप व्यवस्था करणे व इतर अनुषंगिक आवश्यक कामे करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये कोरोना कोव्हिड- १९ चे रूग्ण संख्या झपाट्याने वाढत आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र.३० हद्दीत कासारवाडी, दापोडी फुगेवाडी इत्यादीचा भाग येत आहे. सदर कासारवाडी भागात प्रशासनाकडून ज्या भागात रूग्ण सापडत आहेत त्या भागाचे सीमा प्रतिबंधीत करणे, पोलीसांना पहारा देणेसाठी व बंदोबस्तासाठी मंडप टाकणे, प्रतिबंधीत क्षेत्र फ्लेक्स लावणे, त्याभागातील दुकानांना सम-विषम तारखेचे बोर्ड तयार करणे इत्यादी कामे दररोज करावी लागत आहेत. त्याकरिता स्थापत्य विभागामार्फत ठेकेदार यांची नेमणूक करणेकरीता मा. अति.

आयुक्त(२) श्री.अजित पवार यांच्या दि.२३/०६/२०२० च्या मंजुर प्रस्तावानुसार व सुचनेनुसार दि.३१/०३/२०२१ ते दि.०७/०४/२०२१ दरम्यान रक्कम रू.३,००,०००/- चे कोटेशन मागविण्यात आले आहेत. त्यानुसार मे.लालदिप कन्स्ट्रक्शन यांचेकडून ३.३०% कमी इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र.३० हद्दीत कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी इत्यादीचा भाग येत आहे. सदर कासारवाडी भागात प्रशासनाकडून ज्या भागात रूग्ण सापडत आहेत त्या भागाचे सीमा प्रतिबंधीत करणे, पोलीसांना पहारा देणेसाठी व बंदोबस्तासाठी मंडप टाकणे, प्रतिबंधीत क्षेत्र फ्लेक्स लावणे, त्याभागातील दुकानांना सम-विषम तारखेचे बोर्ड तयार करणे ही परिणामकारक दैनंदिन कामे होणे करिता सदर कामासाठी ठेकेदारनेमणे अत्यंत आवश्यकआहे. मे.लालदिप कन्स्ट्रक्शन यांची ठेकेदार म्हणून कामाकरीता यांची नेमणूक करणेत यावी असे मत आहे .त्यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे केलेली आहेत व सध्या काही कामे प्रगती पथावर आहेत त्यांनी मनपाला आत्तापर्यंत वेळोवेळी आवश्यक मागणीनुसार सेवा दिलेली आहे. सबब, त्याकामी मे. लालदिप कन्स्ट्रक्शनयांची नेमणुक करुन त्याकरीता (३.३०% कमी) एवढा दर प्राप्त झालेलाआहे. तरी प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कामाकरीता एकूण कामाच्या म्हणजे रक्कम रू.३,००,०००/- रक्कमेपैकी ३.३०% कमी या दराने म्हणजेच र.रू.२,९०,१००/- (र.रू.दोन लाख नव्वद हजार शंभर फक्त) पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करून बील अदायगी करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२५९ विषय क्रमांक- २१
दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- कायदा
सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कास/६/कावि/३२५/२०२१,दि.०२/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठीचे आकुर्डी येथील प्रस्तावात नमूद प्रमाणे मा.न्यायालयामधील मा.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग व नियुक्त कर्मचारी यांचे सन २०२०-२०२१ चे वेतन व भत्ते र.रु.१,३७,०३,९८८/- (अक्षरी र.रु.एक कोटी सदोत्तीस लाख तीन हजार नऊशे अठ्ठ्याऐंशी फक्त) पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडून प्रतिपुर्तीव्दारे अदा करणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२६० विषय क्रमांक- २२
दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- उद्यान/वृक्षसंवर्धन
सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश
संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.उद्यान/४/कावि/४८४/२०२१,दि.०२/०९/२०२१.

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०२१-२२ बाब क्र.१ अन्वये टाटा मोटर्स रस्ता भोसरी ते थरमॅक्स चौक रस्ता सुशोभिकरण व मध्यदुभाजक उद्यान विषयक कामाची

देखभाल करणे कामी मे.तुळजाभवानी सर्व्हिसेस. (निविदा र.रु.१,४५,७०,०००/-) पेक्षा -१५.९९% या कमी दराची निविदा मंजुर दराने २४ महिने कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.१,२२,४०,२५७/- (अक्षरी र.रु.एक कोटी बावीस लाख चाळीस हजार दोनशे सत्तावण्ण फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२६१ विषय क्रमांक- २३
दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- उद्यान/वृक्षसंवर्धन
सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश
संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.उद्यान/४/कावि/४८५/२०२१,दि.०२/०९/२०२१.
मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०२१-२२ बाब क्र.३ अन्वये क व ई क्षेत्रिय कार्यालयातील रस्ते मध्य दुभाजक सुशोभिकरण देखभाल करणे कामी मे.तुळजाभवानी सर्व्हिसेस. (निविदा र.रु.९२,२७,७३६/-) पेक्षा -२२.२२% या कमी दराची निविदा मंजुर दराने २४ महिने कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.७१,७७,३३३/- (अक्षरी र.रु.एक्काहत्तर लाख सत्याहत्तर हजार तीनशे तेहत्तीस फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२६२ विषय क्रमांक- २४
दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- वाहन दुरुस्ती कार्यशाळा
सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश
संदर्भ- मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांचे पत्र क्र.काशा/४/कावि/४६१/२०२१, दि.०३/०९/२०२१.
मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड म.न.पा. च्या वैद्यकीय विभागाचे वापराकरीता VACCINE VAN या वाहनाचे म.न.पा. स्पेसिफिकेशन प्रमाणे युटिलिटी व्हेईकल/ डिलेव्हरी व्हॅन खरेदी करून त्यावर बॉडि बिल्डींग करणेकामी ( इंटेरिअरफॅब्रिकेशन वर्क, ओटू सिस्टीम, लाईट व इलेक्ट्रीक सिस्टीम व इतर सुविधा सह) एजन्सी निश्चित करणे बाबत ई- निविदा सुचना क्र.०३/२०२१-२०२२ वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करणेत आली होती. प्राप्त निविदाधारकांमध्ये मे.युनिक एन्टरप्रायजेस, तळवडे, पुणे, यांचे दर हे निविदा रक्कमेपेक्षा ८.१२% ने कमी दर प्राप्त झाले आहेत. मे.युनिक एन्टरप्रायजेस, तळवडे, पुणे, यांनी निविदेमध्ये भरलेल्या दरापेक्षा एकूण ८.१२ % (र.रू.१५,२५,२००/ - GST वगळून) ने कमी दर दिले आहेत. सबब वरील बाबीचा विचार करता मे.युनिक एन्टरप्रायजेस, तळवडे, पुणे, यांचेकडून करारनामा करून घेऊन पिं.चिं.मनपा वैद्यकीय विभागाचे वापराकरीता VACCINEVAN या वाहनाचे म.न.पा. स्पेसिफिकेशन प्रमाणे युटिलिटी व्हेईकल/ डिलेव्हरी व्हॅन खरेदी करून त्यावर मनपा स्पेशिफिकेशन प्रमाणे बॉडी बिल्डींग करून घेणेकामी (इंटेरिअर फॅब्रिकेशन वर्क, ओटू सिस्टीम, लाईट व इलेक्ट्रीक सिस्टीम व इतर सुविधा सह) येणारा खर्च

र.रू.१५,२५,२००/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख पंचवीस हजार दोनशे फक्त) अधिक नियमानुसार वस्तू व सेवा कर (GST) अदा करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२६३ विषय क्रमांक- २५

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- वाहन दुरुस्ती कार्यशाळा

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति.आयुक्त(३) यांचे पत्र क्र.काशा/४/कावि/४६२/२०२१,दि.०३/०९/२०२१.

मा.अति.आयुक्त(३) यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिं.चिं.मनपा वैद्यकीय विभागाचे वापराकरीता BLOOD MOBILE COLLECTION VAN या वाहनाचे मनपा स्पेशिफिकेशनप्रमाणे चॅसी खरेदी करून त्यावर मनपा स्पेशिफिकेशन प्रमाणे बॉडी बांधुन घेणेकामी ई- निविदा सुचना क्र.०२/२०२१-२०२२ वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करणेत आली होती. प्राप्त निविदाधारकांमध्ये मे. राजस्थान बॉडी बिल्डर्स, वडोदरा गुजरात, यांचे दर हे निविदा रक्कमेपेक्षा ८.४०% ने कमी दर प्राप्त झाले आहेत. मे.राजस्थान बॉडी बिल्डर्स यांचे दर सर्वात कमी असलेतरी त्यांना इकडिल पत्र क्र. काशा/४/कावि/३०७/२०२१ दि.८/६/२०२१ च्या पत्रान्वये आपण निविदा दरामध्ये भरलेल्या दरापेक्षा अजून किती दर कमी करू शकता ? या बाबत विचारणा करणेत आली होती. त्यानुसार त्यांनी दि.०९/६/२०२१ च्या पत्रान्वये ( मेल द्वारे ) निविदेमध्ये भरलेल्या दरापेक्षा र.रू.५७५४/- इतकी रक्कम कमी केलेली आहे. तसेच मे.राजस्थान बॉडी बिल्डर्स यांना दि.१०/६/२०२१ रोजी पुनश्च दर कमी करणे बाबत पत्र देणेत आले असता, त्यांनी त्यांचेकडील दि.११/६/२०२१ च्या पत्रान्वये दर कमी करणेस नकार दिलेला आहे. मे.राजस्थान बॉडी बिल्डर्स यांनी निविदेमध्ये भरलेल्या दरापेक्षा एकूण ८.५४% (र.रू.३७,१०,०००/ - GST वगळून) ने कमी दर दिले आहेत. सबब वरील बाबीचा विचार करता मे. राजस्थान बॉडी बिल्डर्स यांचेकडून करारनामा करून घेऊन पिं.चिं.मनपा वैद्यकीय विभागाचे वापराकरीता BLOOD MOBILE COLLECTION VAN या वाहनाचे मनपा स्पेशिफिकेशनप्रमाणे चॅसी खरेदी करून त्यावर मनपा स्पेशिफिकेशन प्रमाणे बॉडी बांधुन घेणेकामी येणारा खर्च र.रू.३७,१०,०००/- (अक्षरी र.रु.सदोतीस लाख दहा हजार फक्त) अधिक नियमानुसार GST अदा करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२६४ विषय क्रमांक- २६

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- वैद्यकिय मुख्य

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१०/कावि/८७४/२०२१,दि.०३/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

भारत सरकार तसेच राज्य शासनाने कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याप्रमाणे आपत्ती घोषीत करुन कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता

कामकाजाचे नियोजन करण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रसार मोठया प्रमाणात वाढला होता. त्याप्रमाणे रुग्णांची संख्या देखील दिवसेंदिवस वाढली होती. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रात कोवीड १९ लसीकरण केंद्र कार्यान्वीत करण्यात आली आहे व त्यानुसार त्यामध्ये पहिल्या टप्प्यात नोंदणीकृत आरोग्य सेवा देणारे व फ्रंन्ट लाईन वर्कर यांचे तसेच दुस-या टप्प्यात वय वर्ष ६० वर्षावरील व्यक्ती व ४५ ते ६० या वयोगटातील सहव्याधी असलेल्या व्यक्तींचे कोवीड १९ चे लसीकरण करण्यात येत आहे. त्याकामी सदर लसीकरण कार्यक्रमामध्ये नागरिकांना लस दिल्यानंतरची माहिती पोर्टलवर भरणेकामी, लसीकरण पुर्ण झाल्यानंतर अहवाल सादर करणे या डाटा एन्ट्री कामकाजासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील मनुष्यबळ अपुरे पडत आहे व प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता असल्यामुळे डाटा एन्ट्री ऑपरेटर (स्वयंसेवक) यांची पि.चि.मनपाचे ८ रुग्णालय झोन करीता प्रत्येकी ८ या प्रमाणे डाटा एन्ट्री ऑपरेटर (स्वयंसेवक) यांची नियुक्ती करणेस व याकामी प्रत्येकी प्रति माह १०,०००/- (अक्षरी र.रु.दहा हजार फक्त) प्रमाणे येणारा खर्च भांडार विभागामधील "कोरोना निधी"या लेखाशिर्षकामधून करण्यास मा. आयुक्त सो. यांचेकडील आदेश क्र.वैद्य/१०/कावि/३७४/२०२१ दि.४/५/२०२१ अन्वये मान्यता देणेत आली असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक- १०२६५ | विषय क्रमांक- २७ |
| दिनांक- ०८/०९/२०२१ | विभाग- स्थापत्य PMAY |
| सुचक- मा.बारणे अभिषेक | अनुमोदक- मा.भोईर सुरेश |

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/PMAY/५९२/२०२१,दि.०३/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

प्रस्तावात नमुद मे.क्रिसील रिस्क अँड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि.हे पात्र सल्लागार ठरलेने दि.15/06/2021 रोजी सदर निविदेचे आर्थिक पाकीट उघडणेत आले आहे. त्यानुसार मे.क्रिसील रिस्क अँड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि. यांनी मुळ दर र.रु.1,90,80,000/- इतका सादर केला आहे. दि.24/06/2021 व दि.08/07/2021 चे पत्रान्वये मे.क्रिसील रिस्क अँड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि. यांना दर कमी करणेबाबत विचारणा केली असता त्यांनी दि.05/08/2021 चे पत्रान्वये 24 महिने कालावधीसाठी GST व सर्व करांसह अंतिमत: सुधारित दर र.रु.1,70,00,000/- इतका दिला आहे. वरील प्रमाणे निविदा क्र.100/01/2020-2021 साठी प्राप्त झालेल्या निविदेनुसार मे.क्रिसील रिस्क अँड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि. या सल्लागाराची 24 महीने कालावधीसाठीGST व सर्व करांसह र.रु.1,70,00,000/- या दराने निविदा आलेली असल्याने व तुलनात्मकदृष्टया वाजवी दराची असल्याने तसेच सल्लागार मुदतीमध्ये प्रस्तुत काम मानांकनाप्रमाणे पुर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत मा.आयुक्त यांनी दि.03/09/2021 रोजी मान्यता दिलेली आहे. वरील सल्लागाराकडून निविदा मंजूर दराने काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा घेणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२६६ विषय क्रमांक- २८

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- विद्युत मुख्य

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/८७२/२०२१,दि.२७/०८/२०२१.

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या विद्युत विभागाकडील (निविदा क्र.३७/६-२०२०-२१) प्रभाग क्र.२५ ताथवडे येथील जीवननगरकडून मुंबई-बैंगलोरकडे जाणारा २४.०० मी. रूंद डी.पी. रस्त्यांवर विद्युत विषयक कामे करणे.मे.एस.टि.इलेक्ट्रिकल्स प्रा.लि. नि.र.रू.४,६७,९८,७१३/- (अक्षरी र.रु.चार कोटी सदुसष्ठ लाख अठठ्याण्णव हजार सातशे तेरा फक्त) पेक्षा ३१.५०% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेकरीता सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे पुढील कार्यवाहि करणेस मंजूरीकामी ठेवणे आवश्यक आहे. सबब, उपरोक्त निविदांपैकी मे.एस.टि. इलेक्ट्रिकल्स प्रा.लि. या ठेकेदाराची निविदा, निविदा रकमेच्या ३१.५०% कमी, ही सर्वात कमी दराची असल्याने स्विकृती करणेबाबत मा.अति.आयुक्त (१) यांनी दि.३१/०७/२०२१ रोजी मान्यता दिलेली आहे.त्यानुसार मे.एस.टि.इलेक्ट्रिकल्स प्रा.लि. यांचेकडून नियमानुसार व निविदेतील निविदा अटीस अधिन राहुन करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२६७ विषय क्रमांक- २९

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- पाणीपुरवठा

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भा.आ./पापु प्रकल्प/अ-२/१९९/२०२१,दि.०३/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

“भामा आसखेड धरणावरील अशुध्द जलउपसा केंद्र पासून नवलाख उंब्रे ब्रेक प्रेशर टाकीपर्यंत १७०० मि.मी. व्यासाची रायझिंग मेन टाकणे.” या कामासाठी आदेश मे.ऑफशोर इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना देणेत आलेले आहेत. सदर कामाच्या अंतर्गत भामा आसखेड प्रकल्पांतर्गत भामा आसखेड धरणापासून नवलाख उंब्रे येथील बी.पी.टी. पर्यंत १७०० मि.मी. व्यासाची पंपीग मेन टाकणेचे काम करणेत येणार आहे. सदर जलवाहिनी टाकणेकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व वनखाते इ. च्या अखत्यारितील रस्ता खोदाई करणेस महानगरपालिकेस परवानगी घ्यावी लागेल व त्यांचे कडील दरानुसार शुल्क महानगरपालिकेमार्फत अदा केले नंतर परवानगी मिळणार असल्याने मा. स्थायी समिती ठराव क्र.

८२९२ दि.२७/०१/२०२१ नुसार वरील नमुद कामांच्या प्रशासकीय रक्कमेतुन अदा करणेस मान्यता देणेत आलेली आहे. सद्यस्थितीत कामाचे ठेकेदार यांनी पुरविलेल्या साहित्य तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी रस्ता खोदाईस दि. २५/०८/२०२१ रोजी दिलेल्या परवानगीपोटी तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग यांना रस्ता खोदाईची रक्कम अदा करावी लागणार असल्याने सदर कामावर सन २०२१ -२२ साठी तरतुद अपुरी पडत आहे. त्यामुळे पाणीपुरवठा विशेष योजना निधी या लेखाशिर्षाअंतर्गत प्रस्तावातील नमुद कामांवर वाढ/घट करणेस मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु.१५,००,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेण्यात आले.**

ठराव क्रमांक- १०२६८ | विषय क्रमांक- ३०

दिनांक- ०८/०९/२०२१ | विभाग- लेखा

सुचक- मा. सुवर्णा बुर्डे | अनुमोदक- मा. भिमाबाई फुगे

संदर्भ- १)मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.लेखा/२६/कावि/९९/२०२१, दि.०६/०९/२०२१.

२)मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.लेखा/२६/कावि/१०२/२०२१, दि.०८/०९/२०२१.

मा. आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामधून पवना, इंद्रायणी व मुळा या नदया वाहतात. यामधील मुळा नदीचा बहूतं:श भाग पुणे मनपामध्ये येत असल्याने सदरचा प्रकल्प पुणे मनपामार्फत राबविणेत येणार आहे. तथापि शहरातून वाहणा-या पवना नदीची लांबी सुमारे 24.50 किमी व इंद्रायणी नदीची लांबी सुमारे 24.50 किमी आहे. या नदयांचे पुनरुज्जीवन करणेच्या प्रकल्पाला यापूर्वीच मा. महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार पवना व इंद्रायणी नदीच्या प्रकल्प अहवालास पर्यावरण ना हरकत (Environment Clearance) बाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विषयक समितीकडे पाठविलेला आहे. सदरची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. सदरच्या प्रकल्पाला EC मिळालेनंतर मंजूर DPR नुसार प्रकल्पाची अंमलबजावणी करणेच्या आवश्यक खर्चासाठी प्रत्येक वर्षी होणा-या खर्चाच्या प्रमाणात म्यूनिसिपल बॉंडच्या माध्यमातून निधी उभारणेचे प्रस्तावित आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सुरुवातीला अंदाजे र.रु.200/-कोटीपर्यंतचा निधी कर्ज/कर्जरोखे या स्वरुपात उभारण्याचा मानस असून याकामी"पीसीएमसी" किंवा "जारीकर्ता" किंवा खाजगी प्लेसमेंट आधारावर कर्ज देण्याच्या ("बॉंड्स") च्या स्वरुपात कर्ज उभारण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने महापालिकेने कर्ज/कर्जरोख्यांसाठी सन 2021-22 च्या अर्थसंकल्पामध्ये मा. महापालिका सभा ठराव क्र. 632, दि.31/03/2021 अन्वये “महापालिका भांडवली प्रकल्पांसाठी कजरोखे उभारणे” या लेखाशिर्षाखाली

400 कोटी रुपयांची तरतूद कर्ज/ कर्ज सुरक्षा ठेव म्हणून मंजूर करण्यात आलेली आहे. त्यानुसार कर्ज/कर्जरोखे उभारण्यासाठी काही संस्थांची नेमणूक करणे आवश्यक असलेने मर्चंट बँकर, क्रेडीट रेटींगसंस्था, डीबेंचर ट्रस्टी, रेजीस्ट्रार, लीगल कौंसिल, डीपॉझीटर, स्टॉक एक्स्चेंज, बँकर इ. संस्थांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीमध्ये या संस्थापैकी मर्चंट बँकर, क्रेडीट रेटींगसाठी, डीबेंचर ट्रस्टी, रेजीस्ट्रार, लीगल कौंसिल यांची मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.9672, दि. 09/06/2021 व क्र.10054, दि.04/08/2021 अन्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे. वरील बाबींच्या आधारे महापालिका बाँड्स जारी करण्यासाठी खालील बाबींस मान्यता मिळणे आवश्यक आहे.

**अ)**केवळ महानगरपालिकेच्या विद्यमान मंजुरी (वर सूचीबद्ध केल्या गेलेल्या) खाजगी प्लेसमेंट आधारावर डिबेंचर्सच्या स्वरुपात बाँड्स वाढवू शकते जेणेकरुन कमाल मर्यादेपर्यंत र. रू. 200/- कोटी नदी सुधार प्रकल्पांच्या अंमलबजावणीत महानगरपालिकेच्या वाट्याला अर्थसहाय्य देण्यासाठी (यापुढे "बाँड्स" म्हणून संदर्भित), आणि जे अटी व शर्तीनुसार मान्यताप्राप्त स्टॉक एक्सचेंज वर सूचीबद्ध केले जाऊ शकते,सेबी (म्युनिसिपल डेट सिक्युरिटीजची जारी व यादी) विनियम, 2015 नुसार,सिक्युरिटीज कॉन्ट्रॅक्ट्स (नियमन) अधिनियम, 1956,सेबी (डेट सिक्युरिटीजची जारी व यादी) विनियम, 2008, आणि यासंबंधातील इतर कायदे, नियम, दिशानिर्देश, अधिसूचना, परिपत्रके, किंवा इतर कोणत्याही नियामक प्राधिकरणाद्वारे जारी केलेले.

**ब)**महापालिका आयुक्त/ अतिरिक्त आयुक्त आणि त्याद्वारे अधिकृत/ संयुक्तपणे आणि सर्व व्यवहारांच्या कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यास अधिकृत असतील. यामध्ये ऑफर दस्तऐवज, उपक्रम, करार, बाँड्स इश्यू कमिटीची स्थापना यासह कोणत्याही बाबींचा निर्णय घेण्याबाबत आणि महापालिका/ महामंडळामार्फत बाँड्स जारी करण्यासंबंधी कोणतेही काम हाती घेईल.

**क)**वरीलप्रमाणे नमुद केलेनुसार महानगरपालिकेची बाँड्स इश्यू कमिटी ("बाँड कमिटी") ची स्थापना करुन त्यामध्ये खालील सदस्यांचा समावेश असेल:

1) आयुक्त

2) अतिरिक्तआयुक्त

3) मुख्यलेखाववित्तअधिकारी

4) प्रकल्प संबंधित विभागाचे विभाग प्रमुख

5) मुख्य लेखा परिक्षक

उपरोक्त नमुद बाँड कमिटीबाँडचे प्रमाण, वेळ आणि स्वरुप, जारी करण्याच्या पद्धतीचा निर्णय घेण्यास अधिकृत असेल तसेच या संदर्भातील पतधोरण एजन्सीज, विश्वस्त, कायदेशीर सल्लागार, ठेवीदार, स्टॉक एक्सचेंजइ. किमान सदस्यता, ओव्हरस्क्रिप्शनची धारणा, मुदतवाढ यासह मर्यादित नसलेल्या सर्व मध्यस्थ व एजन्सींची नियुक्ती करेल तसेच बाँडइश्यू करणे अथवा बाँड इश्यू (निर्गत) लवकर प्रारंभ इ. बाबी करेल.

**ड)**तसेच बॉंड समितीचे सदस्य संयुक्तपणे आणि सर्व पुढील कार्यवाही करण्यास अधिकृत असतील, त्यामध्ये सर्व आवश्यक कृत्ये, सर्व आवश्यक कागदपत्रे/ करार/ साधने/ अनुप्रयोग आणि त्यासंबंधीच्या लेखी घटनांवर स्वाक्षरी करतील, तसेच त्यांना आवश्यक आणि इच्छित वाटेल त्या बाबी त्यांच्या निर्णयावर अवलंबून असतील. बॉंड कमिटीला इतर गोष्टींबरोबरच पुढील बाबींचा अधिकार दिला जाईल:

1) क्रेडिट रेटिंग एजन्सीज, विश्वस्त, Registrar, कायदेशीर सल्ला, डिपॉझिटरीज, स्टॉक एक्सचेंज, बँकर्स इत्यादींची नियुक्ती अंतिम आणि मंजूर करणे. बाँडच्या अशा प्रकारच्या ऑफरमध्ये सामील होणे आणि फी, कमिशन, दलाली इत्यादींचा समावेश असलेल्या अशा सर्व व्यक्ती/ संस्थांना मोबदला देणे. त्यांच्या वैयक्तिक नियुक्ती पत्रात नमूद केल्याप्रमाणे अशा अटी व शर्ती परस्पर ठरविल्या जाऊ शकतात.

2) प्रचलित बाजारपेठेतील अटी आणि लागू कायद्यांचा विचार करून इश्यूची मुदत, व्याज दर इत्यादी बाँडच्या जारी करण्याच्या अटी अंतिम करणे.

3) मुदतीची पत्रे, बाँडची रचना, तसेच संरचित पेमेंट मेकेनिझम / एस्क्रो मॅकेनिझम / Waterfall Mechanism/ बुडीत फंडाची यंत्रणा/ व्याज देय यंत्रणा/ डीएसआरए यंत्रणा किंवा बॉन्ड्सची रचना आणि वेळेवर सर्व्हिसिंगसाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही इतर अटी/ यंत्रणा निश्चित करुन अंतिम करणे.

4) बाँडच्या मुद्यासाठी वित्तीय स्टेटमेन्ट/ प्रकटीकरण दस्तऐवज/ माहिती ज्ञापन/ ऑफर कागदपत्र आणि इतर कागदपत्रे काढणे, अंतिम करणे आणि स्वाक्षरी करणे आणि सेबी आणि स्टॉक एक्सचेंजमध्ये ते आवश्यक असल्यास आवश्यक ती कागदपत्रे / करारनामा सादर करणे. यामध्ये करार/ कामे/ सामंजस्य करार/ प्रमाणपत्रे/ प्रतिज्ञापत्रे/ घोषणा पत्रे/ उपक्रम इ. आणि इतर सर्व आवश्यक कागदपत्रे आणि अशी सर्व कृत्ये आणि गोष्टी करणे. तसेच सेबीच्या योग्य पूर्ततेच्या मुदतीत बाँडचे वाटप करणे आणि त्यासंबंधात आवश्यक असलेल्या सर्व औपचारिकतांचे पालन करणे. तसेच स्टॉक एक्सचेंज किंवा अन्य बाँडस जारी करण्यासाठी लागू असणारे कायदे किंवा नियम यांचा अवलंब करेल.

5) राष्ट्रीय नगरपालिका लेखा नियमावलीनुसार किंवा राज्य शासनाने लागू केलेल्या तत्सम महानगरपालिका लेखा नियमावलीनुसार किंवा जाहीर केलेल्या कागदपत्र/ माहिती ज्ञापनपत्रात समाविष्ट असलेल्या लागू असलेल्या आर्थिक मते/ पुर्न-स्वरूपित वित्तीय विवरण पत्रकांना बाँड्स जारी करण्यासाठी मंजुरी देणे.

6) बाँड्सचे वर्गणी म्हणून मिळालेले अर्जाचे पैसे स्वीकारणे, वाटपाच्या आधारे निर्णय घेणे, बाँड्सचे वाटप मंजूर करुन बाँड्सचे वाटप करणे.

7) संबंधित अथॉरिटीज/ नियामक संस्था/ एजन्सी कडून लिस्टिंग ॲप्लिकेशनची अंमलबजावणी तसेच स्टॉक एक्सचेंजसह लिस्टिंग करारासारख्या सर्व आवश्यक मंजूरी मिळविण्यासाठी अर्ज करणे व पाठपुरावा करणे. म्हणजेच बीएसई लिमिटेड ("बीएसई") किंवा बाँडच्या यादीसाठी

नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड ("एनएसई"), रजिस्ट्रार, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ("एनएसडीएल") आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) यांच्याशी करारनामा करणे. बाँड्सचे डिमटेरिअलायझेशनसाठी मर्यादित ("सीडीएसएल") आणि प्रशासकीय/ महामंडळाच्या/ महापालिकेच्या वतीने कोणत्याही आवश्यक वैध प्राधिकरणाद्वारे आवश्यक असलेल्या बाँडस जारी करण्यासंबंधी इतर आवश्यक कागदपत्रे/ करार अंमलात आणणे/ करणे.

8) रोख्यांच्या वर्गणीच्या संदर्भात अर्जाची रक्कम गोळा करण्यासाठी एक किंवा अधिक बँकर्स यांची नियुक्त करणे.

9) बाँड इश्यू करण्यासाठी बँकांकडे एक किंवा अधिक विना-हक्क एस्क्रो चालू (करंट) खाती उघडणे आणि बाँड्स जारी करताना गुंतवणूकदारांकडून प्राप्त झालेल्या रकमेसाठी तसेच स्ट्रक्चर्ड पेमेंट मेकॅनिझम/ एस्क्रो मॅकेनिझम / Waterfall Mechanism चे कामकाज चालविण्यासाठी/ बुडणाऱ्या निधीची यंत्रणा/ व्याज देय यंत्रणा/ डीएसआरए यंत्रणा किंवा बाँडच्या जबाबदा-या तसेच वेळेवर परतफेड करण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही इतर अटी/ यंत्रणा निश्चित करणे.

10) मास्टर क्रिएशन फॉर्म, कॉर्पोरेट ऍक्शन फॉर्म आणि एनएसडीएल आणि सीडीएसएल तसेच बॉन्ड्सच्या डिमटेरिअलायझेशनसाठी रजिस्ट्रारकडे आवश्यक ते कागदपत्रे/ करार तयार करणे, स्वाक्षरी करणे, फाईल करणे आणि अंमलात आणणे.

11) संबंधित नियामक/ वैधानिक मुद्यांच्या पूर्ततेसाठी आणि डीईएमएटी (DEMAT)खात्यात वाटप/ बाँड प्रमाणपत्रांची पतपत्रे जमा न करणे यासारख्या कोणत्याही पूर्व-इश्यू/ इश्युनंतर गुंतवणूकदारांच्या समस्या/ तक्रारींचे निवारण करण्यासाठी अनुपालन अधिकारी नेमणे. उदा. परतावा ऑर्डर, व्याज वॉरंट इ.

12) डीएएमएटी (DEMAT) सुविधा अंतर्गत बाँडचे वाटप करणे आणि एनएसडीएल/ सीडीएसएल, Registrarआणि हस्तांतरण एजंट्स यांच्याशी आवश्यक करार करून डीईएमएटी (DEMAT) सुविधा पुरविणे.

13) बॉण्ड्स डिमटेरियलायझेशन आणि याद्या सूचीबद्ध करण्याच्या प्रस्तावित मुद्यासाठी महामंडळाचा/ महापालिकेचा शिक्का चिकटविणे.

14) लागू कायदे व नियमांनुसार मुद्रांक शुल्क भरणे.

15) जारीकर्त्याच्या बाँडच्या प्रस्तावित मुद्द्यांशी संबंधित इतर कोणत्याही विषयावर निर्णय घेणे.

**ग)** महानगरपालिका आयुक्त/ अतिरिक्त आयुक्त त्यांच्या पुढील बैठकीत जनरल बोर्डाची मान्यता मिळाल्यानंतर पुढील अतिरिक्त काम करण्यासाठी संयुक्तपणे अथवा प्रत्येक सदस्य अधिकृत असतील.

1) भागधारकांना बाँड प्रमाणपत्रे देणे.

2) बॉण्ड्सचे डिमटेरियलाइझ करण्यासाठी आवश्यक अशी सर्व कृत्ये, कामे, बाबी आणि गोष्टी करणे.

3) एनएसडीएल आणि सीडीएसएलला आवश्यक असलेले सर्व करार आणि अशा दस्तऐवजांवर स्वाक्षरी करणे.

4) वाटप करण्यात आलेल्या लाभार्थींच्या खात्यावर रोखे जमा करणे.

उपरोक्त नमूद तपशिलाप्रमाणे महापालिकेचे कर्ज/ कर्जरोखे उभारणेकामी उपरोक्त प्रस्तावितसर्व बाबींसह याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत मा. महापालिका सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०२६९ विषय क्रमांक- ३१

दिनांक- ०८/०९/२०२१ विभाग- वैद्यकीय मुख्य

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/९/कावि/९४९/२०२१,दि.०६/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

महानगरपालिकेचे वाय.सी.एम. रुग्णालय व इतर रुग्णालयाकरीता नोंदणीकृत संस्थेमार्फत वैद्यकीय अधिकारी,स्टाफनर्स तसेच इतर पॅरामेडीकल स्टाफ व कर्मचारी आऊटसोर्सिंगद्वारे नेमणेकामी एजन्सी नियुक्त करणेकामी इच्छुक व पात्र ठेकेदारांकडून दर मागविणेकामी प्रसिध्द ई-निविदा नोटीस क्र.१०/२०२१-२२ करीता प्राप्त निविदाधारक मे.बी.व्ही.जी. इंडीया लि., मे.श्रीकृपा सर्व्हीसेस प्रा.लि. व मे.रुबी एलकेअर सर्व्हीसेस प्रा.लि. या तिनही निविदा धारकांचा निविदा दर हा सेवाशुल्क किमान वेतनदर(मुळ वेतन+ विशेष भत्ता) ५% वRFP मधील विहीत अटीनुसार तांत्रिक पात्रतेचे मिळालेले १०० गुण समान असलेमुळे रुग्णालय निहाय कामाची विभागणी करुन संबधित पुरवठाधारकांचे नावापुढे नमुद केलेल्या रुग्णालयास दोन वर्षे कालावधीसाठी मनुष्यबळ पुरवठा करणेचे एजन्सी (पुरवठाधारकाची) नेमणुकीस व एजन्सीचे सध्याचे कोविड-१९ साथरोग परिस्थीतीमुळे तिन महिने कालावधीसाठी मनुष्यबळ पुरवठा करणेकामी "कोरोना निधी" या लेखाशिर्षातुन सोबतचे प्रपत्र "अ", "ब" व "क" नुसार येणा-या र.रु.११,३३,७७,१२५/- (अक्षरी र.रु.अकरा कोटी तेहत्तीस लाख सत्याहत्तर हजार एकशे पंचवीस फक्त)चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०२७० विषय क्रमांक- ३२

दिनांक- ०८/०९/२०२१

सुचक- मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक- मा.राजू बनसोडे

संदर्भ- मा.अंबरनाथ कांबळे व मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव.

पिंपळे गुरव येथील कुलस्वामिनी महिला बचत गट हा १२ वर्षापासून महिला सक्षमीकरण व त्यांचे अर्थिक उन्नतीकरीता कार्यरत आहेत. पिंपरी चिंचवड शहरात अनेक वेगवेगळया प्रकारचे चहाची लोकप्रियता पाहता पिंपरी चिंचवड मनपा व वायसीएम रुग्णालय येथे प्रेमाचा चहा व इतर चहाचे केंद्र चालविणेस कुलस्वामिनी महिला बचत गट यांना मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०२७१ विषय क्रमांक- ३३

दिनांक- ०८/०९/२०२१

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ- मा.संतोष कांबळे व मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरात कोविड १९ मुळे उध्दवलेल्या संसर्गजन्य परीस्थितीचा विचार करता या वर्षीचा गणेशोत्सव साध्या पध्दतीने व पर्यावरणीय दृष्टिकोणातुन सुव्यवस्थिपणे पार पडण्याचा निर्यण घेण्यात आलेलाआहे संध्या कोरोना संसर्गजन्य परीस्थितीचा प्रादुर्भाव वाढत असल्याने शहरातील साव्रजनिक गणेशोत्सव मंडळांना मंडप उभारण्याकरिता परवानगीसाठी महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत एकखिडकी योजना राबविणे अत्यंत आवश्यक आहे तसेच कोरोनामुळे निर्माण झालेल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता मंडप परवानगी शुल्क माफ करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०२७२ विषय क्रमांक- ३४

दिनांक- ०८/०९/२०२१

सुचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.संतोष कांबळे

संदर्भ- मा.अभिषेक बारणे व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

ग प्रभागातील मनपाच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात नागरीकांच्या मागणी व विकासाच्या दृष्टीने इतर विशेष योजना-लेखाशिर्षातील कामांची तरतुदी अंत्यत कमी असल्याने प्रभागातील विशेष योजनेतील कामांची निविदा काढलेनंतर संपुर्ण व्याप्तीचे काम होणे शक्य होणार नाही त्यामुळे प्रस्तावात नमुद केलेल्या तक्त्यामधील सन २०२०-२१ च्या

कामांची खर्च न होणारी तरतूद नविन कामांना वाढवुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु.६,५०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०२७३ विषय क्रमांक- ३५

दिनांक- ०८/०९/२०२१

सुचक- मा.राजू बनसोडे अनुमोदक- मा.भालेकर प्रविण

संदर्भ- मा.अभिषेक बारणे व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

ग प्रभागातील मनपाच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात नागरिकांच्या मागणी व विकासाच्या दृष्टीने इतर विशेष योजना- लेखाशिर्षातील कामांची तरतुदी अंत्यत कमी असल्याने प्रभागातील विशेष योजनेतील कामांची निविदा काढलेनंतर संपुर्ण व्याप्तीचे काम होणे शक्य होणार नाही त्यामुळे प्रस्तावात नमुद केलेल्या तक्त्यामधील सन २०२०-२१ च्या कामांची खर्च न होणारी तरतूद नविन कामांना वाढवुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु.३,००,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

------------

(अॅड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे)
सभापती, स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८.



(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८, नगरसचिव विभाग
क्रमांक - नस/३/कावि/१५४० / २०२१
दिनांक - ०९/०९/२०२१

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

(क्र.जशुके/पापु/१६८/२०२१ दि.०६/०८/२०२१ विषय क्र.१ चे लगत)

## वाढ/घट तक्ता

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र./अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | लेखाशिर्ष | सन २१-२२ चा मुळ अंदाज | वाढ करावयाची रक्कम | घट करावयाची रक्कम | सन २१-२२ साठी एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पवना धरणापासुन से.क्र.२३ जलशुध्दीकरण केंद्र निगडी पर्यंत पाणी आणणेसाठी थेट पाईप लाईन टाकणेच्या कामांतर्गत पुरविलेल्या साहित्य ठेवणेत आलेल्या जागेचे भाडे व सुरक्षा रक्षकापोटी देण्यात येणारे पगार अदा करणे. | ४४२/२ | मे.एनसीसी-एसएमसी-इंदू (जेव्ही) | इतर विशेष कामे पाणीपुरवठा | १०,००,००० | १२,९५,००,००० | ० | १३,०५,००,००० |
| २ | पवना धरणापासुन से.क्र.२३ पर्यंत थेट पाईप लाईन टाकणे. ( पाटबंधारे विभागाचे (Raw wate charges कमी होणार, पंपींगचा खर्च वाचणार,Trasmission evaporation ,Seepage losses कमी होणार, चांगल्या गुणवत्तेचे पाणी उपलब्ध होणार, शुध्दीकरणावरील रसायन खर्च कमी होणार सन २०३१ पर्यंतच्या लोकसंख्येला फायदा होणार आहे.) | ५५२/१ | - | जे.एन.एन.यु.आर.एम अंतर्गत करावयाची कामे | १८६५९००००० | ० | १२९५००००० | १७३६४००००० |
| | एकूण | | | | १,८६,६९,००,००० | १२,९५,००,००० | १२९५००००० | १,८६,६९,००,००० |

०५/०८/२१

मा. आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- १८

(क्र.इक्षेका/नि-६/कावि/३५४/२०२१ दि.१३/०८/२०२१ विषय क्र.१४ चे लगत)

(९३)

पिंपरी चिंचवड महानगपालिका
इ क्षेत्रिय कार्यालय
विदयुत विभाग
प्रपत्र अ

इक्षेका/नि-६/कावि/ 354 /२०२१ दि. 13/८/२०२१

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा नोटीस क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | दिनांक | एकुण निविदा रक्कम | निविदा दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. सार्थक एंटरप्रायजेस | इक्षेका विदयुत 2-35-2020-2021 | प्रभाग क्र. ५ गवळीनगर सँडविक कॉलनी परिसरातील रस्त्यावरील दिव्यांची फिडरपिलर वार्षीक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणे व अनुषंगीक कामे करणे. सन2020-2021 | दि. 26/7/2021 | आदेश क्र. इक्षेका/नि६ /कावि/350/2021 | 28/7/2021 | 889657/- | 25.00% | 667243/- |
| | | | | | | | | | 667243/- |

सहाय्यक आयुक्त
तथा
क्षेत्रिय अधिकारी
इ क्षेत्रिय कार्याल
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी ३९

(क्र.मसाभां/५/कावि/९४८/२०२१ दि.०६/०९/२०२१ विषय क्र.३१ चे लगत-प्रपत्र"अ")

वाय.सी.एम. रुग्णालय व वाय.सी.एम.एच. कुटुंबकल्याण विभागाकरीता नोंदणीकृत संस्थेमार्फत वैद्यकीय अधिकारी,स्टाफनर्स तसेच इतर पॅरामेडीकल स्टाफ व कर्मचारी नेमणुक करणेकामी किमान वेतन/मानधन + सेवाशुल्क यापोटी येणारा खर्च तपशिल

प्रपत्र "अ"

| अ.क्र. | मनुष्यबळ पुरवठा पदनाम | आवश्यक संख्या | किमान वेतन प्रती महिना | नियुक्ती कालावधी महीने | मासिक खर्च | 3 महीन्यांचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) | ८ | ७५००० | ३ | ६००००० | १८००००० |
| २ | दंतशल्य चिकित्सक | ७ | ४०००० | ३ | २८०००० | ८४०००० |
| ३ | फार्मासिस्ट | ७ | २६७५५ | ३ | १८७२८५ | ५६१८५५ |
| ४ | स्टाफनर्स | २०७ | २६७५५ | ३ | ५५३८२८५ | १६६१४८५५ |
| ५ | ए.एन.एम. | ३१ | २६७५५ | ३ | ८२९४०५ | २४८८२१५ |
| ६ | लॅब टेक्निशियन | ४० | २६७५५ | ३ | १०७०२०० | ३२१०६०० |
| ७ | एक्स-रे टेक्निशियन | १४ | २६७५५ | ३ | ३७४५७० | ११२३७१० |
| ८ | ई.सी.जी. टेक्निशियन | १ | २६७५५ | ३ | २६७५५ | ८०२६५ |
| ९ | फिजिओथेरपिस्ट | १ | २६७५५ | ३ | २६७५५ | ८०२६५ |
| १० | डाटा एन्ट्री ऑपरेटर | १३ | २६७५५ | ३ | ३४७८१५ | १०४३४४५ |
| ११ | वॉर्डबॉय | ० | २३६९१ | ३ | ० | ० |
| १२ | वॉर्डआया | ० | २३६९१ | ३ | ० | ० |
| १३ | भांडारपाल (स्टोअर किपर) | ० | २६७५५ | ३ | ० | ० |
| १४ | सी.एस.एस.डी. टेक्निशियन | ० | २६७५५ | ३ | ० | ० |
| १५ | ब्लड बँक टेक्निशियन | ७ | २६७५५ | ३ | १८७२८५ | ५६१८५५ |
| १६ | ब्लड बँक कौन्सिलर | ० | २६७५५ | ३ | ० | ० |
| १७ | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता (मेडीकल सोशल वर्कर) | २ | २६७५५ | ३ | ५३५१० | १६०५३० |
| १८ | डायलिसीस टेक्निशियन | २ | २६७५५ | ३ | ५३५१० | १६०५३० |
| १९ | बायोमेडील इंजिनिअर | ३ | ३०००० | ३ | ९०००० | २७०००० |
| | | ३४३ | | | ९६६५३७५ | २,८९,९६,१२५ |

एकुण ३महीने कालावधीसाठी सेवाशुल्क र.रु. १०,६४,५३२/-

३ महिने कालावधीसाठी अंदाजे खर्च र.रु. ३,००,६०,६५७/-

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११ ०१८

(क्र.मसाभां/५/कावि/९४८/२०२१ दि.०६/०९/२०२१ विषय क्र.३१ चे लगत-प्रपत्र"ब")

थेरगाव रुग्णालय, जिजामाता रुग्णालय, सांगवी रुग्णालय व यमुनानगर रुग्णालयाकरिता नोंदणीकृत संस्थेमार्फत वैद्यकीय अधिकारी,स्टाफनर्स तसेच इतर पॅरामेडीकल स्टाफ व कर्मचारी नेमणुक करणेकामी किमान वेतन/मानधन + सेवाशुल्क यापोटी येणारा खर्च तपशिल

प्रपत्र "ब"

| अ.क्र. | मनुष्यबळ पुरवठा पदनाम | आवश्यक संख्या | किमान वेतन प्रती महिना | नियुक्ती कालावधी महीने | मासिक खर्च | 3 महीन्यांचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) | ७८ | ७५००० | ३ | ५८५०००० | १७५५०००० |
| २ | दंतशल्य चिकित्सक | ३४ | ४०००० | ३ | १३६०००० | ४०८०००० |
| ३ | फार्मासिस्ट | १२ | २६७५५ | ३ | ३२१०६० | ९६३१८० |
| ४ | स्टाफनर्स | ९१ | २६७५५ | ३ | २४३४७०५ | ७३०४११५ |
| ५ | ए.एन.एम. | ३१ | २६७५५ | ३ | ८२९४०५ | २४८८२१५ |
| ६ | लॅब टेक्निशियन | ३० | २६७५५ | ३ | ८०२६५० | २४०७९५० |
| ७ | एक्स-रे टेक्निशियन | ५ | २६७५५ | ३ | १३३७७५ | ४०१३२५ |
| ८ | ई.सी.जी. टेक्निशियन | ० | २६७५५ | ३ | ० | ० |
| ९ | फिजिओथेरपिस्ट | १ | २६७५५ | ३ | २६७५५ | ८०२६५ |
| १० | डाटा एन्ट्री ऑपरेटर | ४४ | २६७५५ | ३ | ११७७२२० | ३५३१६६० |
| ११ | वॉर्डबॉय | २२ | २३६९१ | ३ | ५२१२०२ | १५६३६०६ |
| १२ | वॉर्डआया | ६ | २३६९१ | ३ | १४२१४६ | ४२६४३८ |
| १३ | भांडारपाल (स्टोअर किपर) | ० | २६७५५ | ३ | ० | ० |
| १४ | सी.एस.एस.डी. टेक्निशियन | ० | २६७५५ | ३ | ० | ० |
| १५ | ब्लड बँक टेक्निशियन | ० | २६७५५ | ३ | ० | ० |
| १६ | ब्लड बँक कौन्सिलर | ० | २६७५५ | ३ | ० | ० |
| १७ | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता (मेडीकल सोशल वर्कर) | ० | २६७५५ | ३ | ० | ० |
| १८ | डायलिसीस टेक्निशियन | ० | २६७५५ | ३ | ० | ० |
| १९ | बायोमेडील इंजिनिअर | २ | ३०००० | ३ | ६०००० | १८०००० |
| | | ३५६ | | | १३६५८९१८ | ४०९७६७५४ |

एकुण ३ महीने कालावधीसाठी सेवाशुल्क र.रु. १५,४५,४८०/-

३ महिने कालावधीसाठी अंदाजे खर्च र.रु. ४,२५,२२,२३४/-

०८/०९/२१

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

(क्र.मसाभां/५/कावि/९४८/२०२१ दि.०६/०९/२०२१ विषय क्र.३१ चे लगत-प्रपत्र"क")

ह.भ.प. प्रभाकर मल्हारराव कुटे रुग्णालय आकुर्डी, जुने आकुर्डी रुग्णालय, नविन भोसरी रुग्णालय, जुने भोसरी व तालेरा रुग्णालयाकरिता नोंदणीकृत संस्थेमार्फत वैद्यकीय अधिकारी,स्टाफनर्स तसेच इतर पॅरामेडीकल स्टाफ व कर्मचारी नेमणुक करणेकामी किमान वेतन/मानधन + सेवाशुल्क यापोटी येणारा खर्च तपशिल

प्रपत्र "क"

| अ.क्र. | मनुष्यबळ पुरवठा पदनाम | आवश्यक संख्या | किमान वेतन प्रती महिना | नियुक्ती कालावधी महीने | मासिक खर्च | ३ महीन्यांचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) | ७६ | ७५००० | ३ | ५७००००० | १७१००००० |
| २ | दंतशल्य चिकित्सक | ३३ | ४०००० | ३ | १३२०००० | ३९६०००० |
| ३ | फार्मासिस्ट | १७ | २६७५५ | ३ | ४५४८३५ | १३६४५०५ |
| ४ | स्टाफनर्स | १०३ | २६७५५ | ३ | २७५५७६५ | ८२६७२९५ |
| ५ | ए.एन.एम. | १८ | २६७५५ | ३ | ४८१५९० | १४४४७७० |
| ६ | लॅब टेक्निशियन | २६ | २६७५५ | ३ | ६९५६३० | २०८६८९० |
| ७ | एक्स-रे टेक्निशियन | १० | २६७५५ | ३ | २६७५५० | ८०२६५० |
| ८ | ई.सी.जी. टेक्निशियन | ० | २६७५५ | ३ | ० | ० |
| ९ | फिजिओथेरपिस्ट | १ | २६७५५ | ३ | २६७५५ | ८०२६५ |
| १० | डाटा एन्ट्री ऑपरेटर | १९ | २६७५५ | ३ | ५०८३४५ | १५२५०३५ |
| ११ | वॉर्डबॉय | २७ | २३६९१ | ३ | ६३९६५७ | १९१८९७१ |
| १२ | वॉर्डआया | ७ | २३६९१ | ३ | १६५८३७ | ४९७५११ |
| १३ | भांडारपाल (स्टोअर किपर) | ० | २६७५५ | ३ | ० | ० |
| १४ | सी.एस.एस.डी. टेक्निशियन | ० | २६७५५ | ३ | ० | ० |
| १५ | ब्लड बँक टेक्निशियन | ० | २६७५५ | ३ | ० | ० |
| १६ | ब्लड बँक कौन्सिलर | ० | २६७५५ | ३ | ० | ० |
| १७ | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता (मेडीकल सोशल वर्कर) | ० | २६७५५ | ३ | ० | ० |
| १८ | डायलिसीस टेक्निशियन | ० | २६७५५ | ३ | ० | ० |
| १९ | बायोमेडील इंजिनिअर | २ | ३०००० | ३ | ६०००० | १८०००० |
| | | ३३९ | | | १३०७५९६४ | ३९२२७८९२ |

एकुण ३महीने कालावधीसाठी सेवाशुल्क र.रु. १५,६६,३४२/-

३ महिने कालावधीसाठी अंदाजे खर्च र.रु. ४,०७,९४,२३४/-

०८/०९/२१

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८